# उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे,
# गुन्हे शाखा, मुंबई

प्रेस नोट

**इन्शुरन्स फ्रॉड**

**विमा कंपनी प्रतिनिधी व विमा प्राधिकरण कर्मचारी असल्याचे भासवुन तसेच जास्त परतावा व बिनव्याजी कर्जाचे आमिष दाखवुन नागरीकांना फसवणा-या मोठया टोळीला उत्तर विभाग सायबर क्राईम ब्रान्च कडून अटक**

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | उत्तर प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, गु.अ.वि. मुंबई |
| २ | गु.र.क्र व कलम | ११/२०२१ कलम ४१९, ४२०,४६५,४६८,४७१,३४ भादवि सह कलम ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम |
| ३ | गुन्हा घडला दि. व वेळ | दि.१४/२/२०२१ रोजी ते दि. ०३/०३/२०२१ दरम्यान |
| ४ | गुन्हा दाखल दि. व वेळ | दिनांक ०३/०३/२०२१ रोजी २१:०५ वाजता. |
| ५ | फसवणुक मालमत्ता | १९,२७,९०६ /-रुपये |
| ६ | हस्तगत मालमत्ता | 1. Redmi 05 IMX 2030 mobile phone<br>IMEI no.1)867815046844174 2)867815046844166<br>Sim No. 1) 7011385949, 2)8588079803<br>2. NOKIA model 106DS2018 mobile Phone<br>IMEI no.1) 354199106774484 2) 354204102574480<br>Sim No. 1) 9625891880 2) 9069565844<br>3. Real mi 5i model no.kmx2030<br>IMEI no.1) 867815046468651 2) 867815046468644<br>Sim No. 1) 9625891880<br>4. Vodafone sim IMSI No. 89910273100003287630GE<br>5. Airtel sim IMSI No. 89910009034741273770<br>खालील वर्णनाचे मोबाईल चे रिकामे बॉक्स त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे..<br>1) Vivo Y15-IMEI No 866281049061095, 866281049061087<br>2) MicroMax X103I-IMEI No 911339557237419, 911339557237427<br>3) MicroMax A58-IMEI No 911328053415785, 911328053415786<br>4) Vivo Y20-IMEI No 865752052701133, 865752052701125<br>5) Vivo V15/Pro-IMEI No 860508048453030, 860508048453022 |
| ८ | हस्तगत करण्यात आलेली रक्कम | 1)Kotak Mahindra bank account no. 1213802894 – Rs.2,00,000/-<br>2)ICICI Bank account no. 095001506931 – Rs.9968/- |
| ९ | अटक आरोपी | १) एक इसम, वय २५ वर्षे, रा.ठि. गाजीयाबाद, उत्तरप्रदेश.<br>२) एक इसम, वय २६ वर्षे रा.ठि. गाझीयाबाद, उत्तरप्रदेश<br>३) एक इसम, वय ३६ वर्षे, रा.ठी. गाझीयाबाद, उत्तरप्रदेश<br>४) एक इसम, वय २८ वर्षे, रा.ठी.- सोनीपत राज्य हारीयाना<br>५) एक इसम, वय २९ वर्षे, रा.ठी. जिल्हा गौतम बुध्द नगर उत्तर प्रदेश<br>६) एक इसम, वय २९ वर्षे, रा.ठि. वेस्ट घोडा दिल्ली. |
| १० | तपासी अधिकारी | पोउपनि भुतेकर, पोनि ठाकुर, पोनि देसाई |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत** :- फिर्यादी यांना जून २०२० ते दिनांक ०३/०३/२०२१ या दरम्यान बानी सिंग, विजय मेहता यांनी ते भारती ॲक्सा विमा कंपनी व दिपक दुबे, महिला नामे स्नेहा व पुजा यांनी ते पीएनबी मेटलाईफ या विमा कंपनीचे कर्मचारी असल्याचे भासवुन जास्त परताव्याचे व सदर विमा पॉलिसी त्यांच्या नावावर

करून देण्याचे अमिष देउन फिर्यादी यांचा पुतण्याच्या नावावर ऑनलाईन विमा पॉलिसी विक्री केल्या. तसेच आरोपीताने bhartiaxa @aol.com या मेलवरून फिर्यादी यांच्या नावाची बनावट विमा पॉलिसी कागदपत्रे पाठवुन ती त्यांना खरी असल्याचे भासवुन फसवणुक केली. तसेच आरोपीतांनी ते IRDA OF INDIA, HYDERABAD कर्मचारी असल्याचे भासवुन फिर्यादी यांच्या नावाने असलेली भारती ॲक्सा लाइफ इंशुरन्स कं. लि पॉलिसी नं ५०२-६९२६१४६ वर आणि पंजाब नॅशनल मॅट लाईफ इंडिया इंन्शुरंन्स कंपनी लिं फ्री इंटरेस्ट लोन पॉलिसी नं २३३८५४८३ वर कंपनीला फायदा झालयाने कंपनी फिर्यादी यांच्या बॅक खात्यात एकुण ७१,८७,४४७/-रुपये तसेच १२,००,०००/-रुपये बिनव्याजी कर्ज,पेन्शन देणार असल्याचे आमिष दाखवून देउन बॅक खात्यात एकुण १८,९७,९०६/- रूपये एवढी रक्क भरण्यास भाग पाडून फिर्यादी यांची फसवणूक केल्याने उत्तर प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ११/२१ कलम ४१९, ४२०,४६५,४६८,४७१,३४ भादवि सह कलम ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**सदर** गुन्हयाचा तपास तांत्रिक व पारंपारिक पद्धतीने करून फिर्यादी यांची फसवणुक करण्यासाठी भास्कर रॉय IRDA OF INDIA, HYDERABAD या नावाने वापरण्यात आलेले सीम कार्ड हे फ्रॉड केवायसी द्वारे मोबाईल कंपनीच्या सेल्स एक्झुकेटीव्ह याने तयार केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यास गाजीयाबाद, उत्तरप्रदेश येथून आणण्यात आले. अटक आरोपीकडे चौकशी केली असता सदरचे सिमकार्ड हे सीम विक्री दुकानाचा मालक असलेला आरोपी व त्याचे साथीदारांच्या मदतीने ॲक्टिवेट केले असल्याची माहिती प्राप्त झाल्याने सदर पाहिजे आरोपीतांना राज्य उत्तरप्रदेश येथून अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतांवर इंद्रानगर पोलीस ठाणे, लखनउ, उत्तरप्रदेशचे गुरक्र.४०४/२० कलम ४१९,४२०,४६५,४६८,४७१ भादवि अन्वये गुन्हा दाखल असल्याची माहीती प्राप्त झाली आहे. त्यामुळे त्यांचेकडे चौकशी केली असता त्यातील ०२ आरोपी हे त्यांचे मोबाईल दुकानामध्ये आलेल्या ग्राहकांच्या प्राप्त कागदपत्रांचा तसेच इतर सर्वसामान्य लोकांच्या कागदपत्रांचा गैरवापर करून त्यांचे नावे बनावट सिमकार्ड ॲक्टिवेट करीत असे व ते सीमकार्ड आपल्या इतर ०३ साथीदारांना देत असत. त्यानंतर आरोपी इसम हे सदर सीमचा वापर करून सर्वसामान्य जनतेस ते नामांकित विमा कंपनींचे प्रतिनिधी असल्याचे भासवून नागरिकांची फसवणुक करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

उत्तर प्रादेशिक सायबर पोलीस ठाणेकडून सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपली फसवणूक टाळण्यासाठी नामांकीत विमा कंपन्यांच्या नावाचा वापर करून आलेल्या कॉलची खात्री करावी. सिमकार्ड ॲक्टिवेट करताना व इतर ठिकाणी आपल्या कागदपत्रांचा गैरवापर होणार नाही याची विषेश काळजी घ्यावी. तसेच विमा कंपनींचे प्राधिकृत वेबसाईट वरूनच माहिती प्राप्त करावी. त्यांचे नावे आलेल्या कॉलला किंवा त्यांनी दिलेल्या कोणत्याही आमिषाला बळी न पडता काहीही संशयास्पद वाटल्यास अथवा फसवणूक झाली असल्यास तात्काळ त्याची माहिती नजिकच्या स्थानिक पोलीसांना अथवा प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे यांना कळवावी.

सदरची प्रभावी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री मिलिंद भारंबे सो., मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस विरेश प्रभु सो., मा. पोलीस उप आयुक्त, डॉ.रश्मी करंदीकर मॅडम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन जाधव सो. व प्रभारी व.पो.नि श्रीमती सरला वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि मधुलिका ठाकुर, पोनि. मंगेश देसाई, पो.उप.नि उद्धव भुतेकर, पो.ना. क्र.९८०७३४/गणेश आयरे, पो.ना.क्र. ९८०८६९/सावंत, पो.ना.क्र.०३११८२/अशोक शिंदे, पो.शि.क्र.०८८६८/श्रीकांत निकम, पोशिक्रं. १३०३१५/चव्हाण, पोशिक्रं. ११०३४/मेघे, पोशिक्रं. ०८०७६८/घुबे, पोशिक्रं. ११०५९३/शिराळकर, पोशिक्रं. १३०२७५/बोरसे यांनी पार पाडली आहे.